आधुनिक विचारांचे
# वर्तमान

बीड । मंगळवार, १९ जानेवारी २०२१ । वर्ष : ३
आपले वृत्तपत्र, आपला आवाज
अंक : १३ । पाने : ४ । मूल्य २ ₹



## सरपंच आरक्षणाची सोडत लांबली

मुंबई : एक महिन्याच्या आतमध्ये सरपंचपदाचे आरक्षण काढू, असे वक्तव्य राज्याचे ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी केले आहे. राज्यातल्या ग्रामपंचायत निवडणुकीचे चित्र आता स्पष्ट झाले आहे. यानंतर आता पॅनल प्रमुखांपासून ते सदस्यांपर्यंत सगळ्यांनाच सरपंचपदाच्या आरक्षणाचे वेध लागले आहेत. याच पार्श्वभूमीवर राज्याचे ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी एक महिन्याच्या आतमध्ये सरपंचपदाचं आरक्षण काढू, असे सांगितले आहे.

# ग्रामपंचायतींमध्ये सोळंकेंना ‘हाबाडा’

### गंगामसला– भाजप, दिंद्रुड– अपक्ष, नित्रुड– कम्युनिस्ट पक्ष, चोपनवाडी– अपक्ष बिनविरोध आणि मोगरा राष्ट्रवादीकडे

▶ प्रतिनिधी

माजलगाव : संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागलेल्या पाच ग्रामपंचायतींचे निकाल हाती लागले असून लागलेल्या निकालातून माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांना मतदारांनी हाबाडा दिला असल्याचे जनतेतून बोलले जात आहे. दरम्यान, गंगामसला– भाजपा, नित्रुड– कम्युनिस्ट पक्ष, दिंद्रुड– अपक्ष, चोपनवाडी– अपक्ष (बिनविरोध) अशी निकालानंतर परिस्थिती राहिली. मात्र एकट्या मोगरा ग्रामपंचायतीने बूज राखत राष्ट्रवादी काँग्रेसचे सात सदस्य निवडून आले.

माजलगाव तालुक्यातील अतिशय चुरशीच्या पार पडलेल्या पाच ग्रामपंचायतींच्या निकालावरून मतदारांनी संमिश्र कौल दिला. तालुक्यातील मोठी बाजारपेठ असलेल्या दिंद्रुड ग्रामपंचायत निवडणुकीत दिलीप कोमटवार यांच्या परिवर्तन पॅनलने ११ जागी विजय संपादन करून जनसेवा पॅनलचे युवराज ठोंबरे यांचा धुव्वा उडविला. या केवळ ४ जागा राखता आल्या. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे माजी प्रमुख ओमप्रकाश शेटे यांनी जनसेवा पॅनलला निवडून आणण्यासाठी वेगवेगळे कसब वापरले. तरी दिंद्रुडकरांनी शेटे यांच्या विरोधात कौल दिला. अतिशय प्रतिष्ठेच्या ठरलेल्या दिंद्रुड ग्रामपंचायत निवडणुकीत शेटे यांच्या गटाला केवळ चार जागी समाधान मानावे लागले. दिलीप कोमटवार यांच्या परिवर्तन पॅनलने मुसंडी मारत तब्बल ११ जागा खेचून आणल्या. दिंद्रुडकरांनी टाकलेल्या विश्वासाबद्दल आपण पूर्णतः समाधानी असून केवळ विकास हाच परिवर्तन पॅनलचा अजेंडा असल्याचे वर्तमानशी बोलताना नवनियुक्त सदस्य अजय दिलीपराव कोमटवार यांनी सांगितले.

नित्रुड ग्रामपंचायत निवडणुकीत अपेक्षेप्रमाणे कॉम्रेड दत्ता डाके यांच्या पॅनलला १२ जागा मिळवून वर्चस्व सिध्द केले, तर राष्ट्रवादीचे नेते मनोहर डाके, उध्दवराव बोरचाटे यांच्या पॅनलला केवळ ५ जागीच समाधान मानावे लागले. नित्रुड ग्रामपंचायतीवर डाव्या विचारसरणीचा लाल बावटा फडकला. राष्ट्रवादीने ही निवडणूक अतिशय प्रतिष्ठेची केली असली तरी हार मानावी लागली. आमदार प्रकाश सोळंके यांच्यासाठी हा मोठा धक्का मानला जात आहे. जनतेने दिलेला कौल आम्हाला मान्य असून जनसेवा मोठ्या वेगाने आणि विकास कामे मार्गी लागतील, असे दत्ता डाके यांनी वर्तमानशी बोलताना सांगितले.

आमदार प्रकाश सोळंके यांच्या सुविद्य पत्नी मंगलाताई सोळंके यांच्या जिल्हा परिषद गटातील गंगामसला ग्रामपंचायत भाजपाने आपल्याकडे खेचून आणली आहे. श्री मोरेश्वर जनशक्ती पॅनलने ६ जागा तर श्री मोरेश्वर ग्रामविकास पॅनलने ४ जागा एका जागी अपक्षाने बाजी मारली. आमदार प्रकाश सोळंके यांचे समर्थक सौ.सारिका सचितानंद सोळंके यांचा केवळ चार मतांनी पराभव झाला. तालुक्यातील चोपनवाडी ग्रामपंचायत बिनविरोध निवडण्यात आली. गावच्या विकासासाठी सर्वपक्षीय समविचारी उमेदवारांनी एकत्र येवून बिनविरोध निवडून देण्याचे काम केले आहे, अशी प्रतिक्रिया ग्रामस्थ आसाराम कांदे यांनी दिली.

### मोगरा ग्रामपंचायतीने राष्ट्रवादीची बूज राखली

जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत शेजुळ यांच्या पात्रुड गटा अंतर्गत येत असलेल्या मोगरा ग्रामपंचायतीने राष्ट्रवादीची बूज राखली असून या ग्रामविकास पॅनलचे माया बळीराम घनघाव, गंगा मोरेश्वर धुमाळ, गंगा संजय राठोड, तुकाराम सर्जेराव भोजने, सुनिता सुभाष घनगाव, उजा अमजद शेख, गोपिका संदिप सावंतहे ७ उमेदवार विजयी झाले आहेत. दरम्यान, अतिशय अटीतटीच्या झालेल्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसकडे एकमेव मोगरा ग्रामपंचायत आली आहे.

### ’गड आला पण सिंह गेला’

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड ग्रामपंचायतीवर परिवर्तन पॅनलचे वर्चस्व सिध्द करून पॅनल प्रमुख दिलीप कोमटवार यांनी आपला दबदबा कायम ठेवला आहे. तब्बल ११ जागी विजय संपादन करून प्रतिस्पर्ध्यांना अस्मान दाखविले. मात्र या निवडणुकीत खुद्द दिलीप कोमटवार हे पराभूत झाल्याने ’गड आला पण सिंह गेला’ अशी प्रतिक्रिया जनमाणसांत उमटत आहे.





### ’सोळंकेंनी आत्मपरीक्षण करण्याची गरज’

माजलगाव तालुक्यातील पाच ग्रामपंचायतीच्या निकालाने आमदार प्रकाश सोळंके यांना धक्का दिला आहे. केवळ एका जागीच राष्ट्रवादीला समाधान मानावे लागले ही बाब आमदार सोळंकेंनी आत्मचिंतन करावे असे वर्तमानशी बोलताना अनेक कार्यकर्त्यांनी सांगितले. दरम्यान, युवा नेते तथा बीड जिल्हा परिषदेचे अर्थ व बांधकाम सभापती जयसिंग सोळंके यांचा मतदारसंघातील कमी झालेला संपर्कही याला कारणीभूत असल्याचे उघडपणे बोलले जात आहे.



मोगरा ग्रामपंचायतीचे विजयी उमेदवार जल्लोष करताना.

## विशेष संपादकीय

# झिंदाबाद जिजा!

'Cast away Cast' अर्थात जातीयवाद हद्दपार करा, अशी घोषणा देत दक्षिण अफ्रिकेतील डर्बानची वंशवाद प्रथाविरोधी परिषद दणाणून सोडणाऱ्या भारतीयाकडे साऱ्या जगाचे लक्ष वेधले, ते भारतीय म्हणजे मानवी हक्क अभियानचे संस्थापक ॲड.एकनाथराव आवाड.



ॲड.आवाड यांना ’जिजा’ या नावाने संपूर्ण महाराष्ट्र ओळखतो. मानवी हक्कांसाठी आयुष्यभर लढा देणाऱ्या लढवय्या जिजांचा १९ जानेवारी जयंतीदिन. त्यानुषंगाने त्यांच्या प्रखर मानवतावादी विचारांचा जागर होणे गरजेचे आहे.

ॲड.एकनाथराव आवाड यांचे संपूर्ण जीवन प्रत्येकाला संदेश देणारे आहे. आंबेवडगावच्या ग्रामसभेपासून जिनिव्हातील मानवी हक्क संरक्षण परिषदेतही तेवढ्याच पोटतिडकीने बोलणारे जिजा एक चळवळ होते. पालावरच्या भिल्ल, पारधी, कोल्हाटी जमातींनाही झिंदाबाद बरोबरच जय भीम शिकवणारे ’जिजा’ सच्चे आंबेडकरी विचारांचे पाईक होते. मानवी हक्क अभियानच्या बहराच्या काळात अनेक संघटना उदयास आल्या. मात्र काहींचा संकुचित दृष्टीकोन असल्याने त्या लयास गेल्या. मानवी हक्क अभियानने एक व्यापक विचार दिला. त्या व्यापक मांडणीच्या केंद्रस्थानी ’जिजा’ होते. दलित पँथरच्या विचाराने प्रभावीत झालेल्या जिजांनी संघर्षात्मक आणि रचनात्मक अशा दोहो पातळीवर चिरकाल टिकणारे काम केले आहे. मराठवाड्यातील वाढते अत्याचार हा त्यांचा चीड आणणारा विषय होता. वेठबिगार मुक्तीपासून विद्यापीठ नामांतर चळवळीत जिजा सक्रीय होते. संपूर्ण आंबेडकरी चळवळीला नवा आयाम देण्याचे काम जिजांनी केले. त्यांच्यावर अनेक टिका, आरोप झाले मात्र घेतलेला वसा टाकायचा नाही, या जिद्दीने जिजा शेवटच्या श्वासापर्यंत नादान व्यवस्थेच्या विरोधात लढतच राहिले. आमचा लढा न्यायासाठी, माणूस म्हणून जगण्यासाठी हा नारा घेऊन मानवी हक्क अभियानने मानवतावादी विचारांची पेरणी केली. मानवी हक्क अभियानचे कार्यकर्ते झिंदाबाद बरोबरच ’जयभीम’चाही नारा देत असत. अन्याय सहन करायचा नाही, त्यासाठी कशाचीही पर्वा न करता वाट्टेल ती किंमत मोजण्याची तयारी जिजांच्या ठायी होती. लोकांची जागृती करून व्यापक संघटन तेही आक्रमक शैलीत उभा करण्याचे कसब केवळ जिजांकडेच होते. जिजांच्या कार्याची नोंद घेत असताना त्यांच्यामुळे मराठवाड्यातील ५० हजार कुटुंबे गायरान जमिनीवर आपला उदरनिर्वाह करत आहेत, ही बाब लक्ष वेधून घेणारी आहे. आयुष्याच्या उत्तरार्धात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दाखवलेल्या धम्माकडे ’जिजा’ वळले. नागपूरच्या पवित्र दीक्षाभूमीवर आपल्या अनुयायासह बौध्दधम्म स्वीकारला. आयुष्यभर अन्यायाबाबत कसलीच तडजोड न करणाऱ्या जिजांना त्यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करतो.

■ **बाबा श्रीहरी देशमाने**



# पणजी नटली; इफ्फी सजली

▶ **भगीरथ तोडकरी**

पणजी : इफ्फी अर्थात भारताचा ५१ वा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला गोव्याची राजधानी पणजी येथे शानदार सुरूवात झाली. दरम्यान, इफ्फीच्या स्वागतासाठी पणजी नगरी नटली असून इफ्फी प्रतिनिधी आणि चित्रपट तारक, तारिकांनी इफ्फी सजली आहे.

सिनेमाची अनुभूती भाषेच्या पलिकडची असते आणि इफ्फी ही सिनेमाची जादू अनुभवायला देणारे, केवळ भारतातीलच नव्हे तर जगभरातील सिनेमानिर्मितीचा उत्सव साजरा करणारे अत्यंत सशक्त व्यासपीठ आहे, असे माहिती आणि प्रसारण मंत्री प्रकाश जावडेकर यांनी प्रतिपादन केले. चित्रपट रसिक आणि समीक्षक दरवर्षी ज्याची आतुरतेने वाट बघत असतात, असा बहुप्रतीक्षित भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव– इफ्फीचा शनिवारी पणजीत शुभारंभ झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री डॉ.प्रमोद सावंत यांची या उद्घाटन सोहळ्याला विशेष उपस्थिती होती. त्याशिवाय, माहिती आणि प्रसारण विभागाच्या अतिरिक्त सचिव, नीरजा शेखर, इफ्फीचे संचालक चैतन्य प्रसाद यांच्यासह भारत सरकारचे अनेक अधिकारी आणि मान्यवर यावेळी उपस्थित होते. इफ्फीचे हे ५१ वे वर्ष असून, चित्रपटांच्या मनोरंजनाची रेलचेल असलेल्या या महोत्सवाची सुरुवात, चित्रपटसृष्टीतील नामवंतांच्या उपस्थितीत मनमोहक सांस्कृतिक कार्यक्रमांनी झाली. गोव्यातील पणजी इथल्या डॉ श्यामाप्रसाद मुखर्जी इनडोअर स्टेडीयमवर आज जगभरातील चित्रपट कलावंत, निर्माते आणि चोखंदळ रसिकांच्या मांदियाळीत या महोत्सवाचा नाद, पुन्हा एकदा दुमदुमला.





> ❝ भारतीय तसेच जागतिक चित्रपट निर्मात्यांनी चित्रपट निर्मितीसाठी गोव्याला यावे. इफ्फीमुळे जगभरातल्या चित्रपट निर्मात्यांना भारताच्या समुद्र किनाऱ्यावरच्या या निसर्गसंपन्न राज्यातले सौंदर्य अनुभवण्याची संधी मिळते.
>
> : **डॉ. प्रमोद सावंत,** मुख्यमंत्री.

# कासारीत महादेव बडे यांचा पॅनल विजयी

▶ प्रतिनिधी

धारुर : तालुक्यातील जहागिरमोहा, भोपा, रूईधारूर, कासारी या ठिकाणच्या ग्रामपंचायतींचे निकाल सोमवारी जाहीर झाला. त्यात जहागिरमोहा ग्रामपंचायतीत कोंबडे बंडू बाबुराव, रब्बानी अब्दुल रहमान, आशाबाई संजय कांदे, रूक्मीणबाई अभिमान शिंदे, शिवकन्या वसुदेव बिल्पे, तुळसाबाई बाजीराव राठोड यांनी विजय मिळवला आहे. तर भोपा ग्रामपंचायतीत रविराज चाटे, प्रविण इंद्रजित वाघचौरे, मीराबाई अशोक वाघचौरे हे उमेदवार विजयी झाले आहेत. कासारी येथे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती महादेव बडे यांच्या पॅनलला एकूण ११ जागेपैकी १० उमेदवारांचा दणदणीत विजय झाला आहे.





## संपादकीय

# शेतकऱ्यांच्या दीर्घ आंदोलनाचे फलित काय?

शेतकऱ्यांच्या हिताआड केंद्र सरकार येत असल्याचे देशभर असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. राजधानी दिल्लीच्या सीमेवर गेले पन्नास दिवस पंजाब, हरियाणा व अन्य राज्यांतील लाखो शेतकरी केंद्र सरकारने केलेला नवा कृषी कायदा रद्द करावा म्हणून ठाण मांडून बसले आहेत. त्यांना दिल्लीत प्रवेश दिला जात नाही आणि ते राजधानीच्या सीमेवरून परत जायला तयार नाहीत. कडाक्याच्या थंडीत आणि पावसात हे शेतकरी नवा कृषी कायदा केंद्राने रद्द करावा यासाठी हट्ट धरून बसले आहेत. गेल्या पन्नास दिवसांत केंद्र सरकारबरोबर तब्बल नऊ वेळा चर्चा झाल्या. अर्धा डझन मंत्र्यांबरोबर चर्चेच्या फेऱ्या झडल्या, पण शेतकरी संघटना कायदे रद्द करा या एकाच मागणीवर हटून बसल्या आहेत. तोडगा निघत नाही, केंद्राच्या तोंडी वा लेखी आश्वासनावर शेतकरी संघटना विश्वास ठेवायला तयार नाहीत आणि केंद्र सरकारही कृषी कायदे रद्द करण्यास तयार नाही. शेतकरी आंदोलनात पेच निर्माण झाला आहे आणि अनेकांच्या याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाल्या आहेत, म्हणून न्यायालयाने पुढाकार घेऊन कृषी कायद्यांच्या अंमलबजावणीस स्थगिती दिली आणि सर्वकष अभ्यास करण्यासाठी व तोडगा सुचविण्यासाठी चार तज्ज्ञांची समिती नेमली. समिती नेमून सर्वोच्च न्यायालयाने काय साध्य केले इथपासून ते समितीच्या शिफारशींतून तोडगा निघेल काय, अशा प्रश्नांवर चर्चा सुरू झाली आहे. मुळात समितीवर तज्ज्ञ म्हणून न्यायालयाने नेमलेले चारही जण हे सरकारधार्जिणे आहेत, असा टीकेचा भडीमार सुरू झाला आहे, मग समिती तरी निष्पक्षपणे कसा अभ्यास करणार, असा संभ्रम निर्माण झाला आहे. मुळात सरकारने केलेल्या कृषी कायद्याला स्थगिती न्यायालयाने देणे योग्य आहे काय, असा प्रश्न निर्माण झाला आहे. सरकारने संसदेत बहुमताने संमत केलेला कृषी कायदा हा घटनात्मकदृष्ट्या योग्य आहे की नाही, यावर न्यायालयाने भाष्य केलेले नाही. कायदा करणे हा सरकारचा अधिकार आहे व संसदेत हा कायदा मंजूर झाला आहे. सरकारने केलेल्या कायद्याला न्यायालयाने स्थगिती देणे असे देशात प्रथमच घडले आहे. एवढेच नव्हे, तर कायद्याला स्थगिती देऊन न्यायालयाने तज्ज्ञांची समिती नेमणे असेही प्रथमच घडले आहे. कायद्यावरील स्थगिती बेमुदत नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे. समितीच्या शिफारसी सरकारवर बंधनकारक नाहीत. कायदा मुळात वैध आहे की नाही हे न्यायालयाने सांगितलेलेच नाही, मग न्यायालयाने केंद्राला झापडले कशाला असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. नवा कृषी कायदा शेतकऱ्यांच्या कसा हिताचा आहे हे त्यांच्या संघटनांच्या नेत्यांना पटवून देण्याचा सरकार नितांत प्रयत्न करीत आहे. गेले दीड महिने त्यात सरकारला यश आलेले नाही हेही वास्तव आहे. पण आंदोलक संघटनांशी सरकारने संवाद बंद केलेला नाही. चर्चेची दारे बंद करून टाकली नाहीत. न्यायालयाने नेमलेल्या समितीमुळे वेळकाढूपणा होईल, असे अनेकांना वाटत आहे. समितीकडे अशी काय जादू आहे की, शेतकरी संघटनांच्या नेत्यांना कृषी कायदा हिताचा वाटू लागेल व आंदोलन मागे घेतले जाईल कृषी कायदा स्थगित केल्यावर व समितीची नेमणूक जाहीर केल्यावरही शेतकरी आंदोलन चालूच राहील, असे त्यांच्या नेत्यांनी जाहीर केले आहे. किंबहुना त्या समितीबरोबर चर्चा करण्यास आम्हाला रस नाही असेही म्हटले आहे. केंद्र सरकार व शेतकरी आंदोलक यांच्यात दीर्घकाळ निर्माण झालेला पेच सोडविण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने पुढाकार घेतला आहे हे चांगले केले. पण शेतकरी नेते समितीला सहकार्य करायला तयार नसतील, तर पुढे काय घडणार आहे हे राजकारण नाही, राजकारण व न्यायपालिकेत अंतर आहे, ज्यांना शेतक–यांच्या समस्यांचे निराकरण व्हावे असे वाटते ते समितीपुढे येतील, असे न्यायमूर्तींनी म्हटले आहे. ही समिती शिक्षा सुनावणार नाही, आदेशही देणार नाही, सर्वांचे म्हणणे ऐकून समिती अहवाल देणार आहे. या समितीला तुम्हाला सहकार्य करावेच लागेल, असे सरन्यायाधीश शरद बोबडे यांनी स्पष्ट केले आहे. विशेष म्हणजे न्यायालयापुढे ज्या काही याचिका आहेत त्यापैकी कोणीही शेतकरी आंदोलनावर तोडगा काढण्यासाठी समिती नेमावी अशी मागणी केलेली नाही. पण न्यायालयाला तसा अधिकार आहे हे नाकारून चालणार नाही. शेतकरी आंदोलन किती काळ चालणार हे कोणीही सांगू शकत नाही. नवे कृषी कायदे रद्द होत नाहीत तोपर्यंत आम्ही घरी परत जाणार नाही, अशी ताठर भूमिका शेतकरी संघटनांच्या नेत्यांनी घेतली आहे. अशी भूमिका घेणे हे परिस्थिती चिघळण्यास कारणीभूत ठरू शकते. येत्या प्रजासत्ताक दिनाला आंदोलक शेतकरी संघटनांनी ट्रॅक्टर मोर्चा काढणार असल्याचे जाहीर केले आहे. देशाच्या प्रजासत्ताक दिनाला शेतकऱ्यांचा सरकार विरोधी मोर्चा निघाला, तर ते मोठे दुर्दैव ठरेल. म्हणूनच त्यापूर्वी काही तोडगा निघावा म्हणून सरकारही प्रयत्नशील आहे. मूलभूत अधिकारांचे उल्लंघन होत नाही तोपर्यंत कायद्याला स्थगिती देऊ नये, असे सरकारच्या वतीने ॲटर्नी जनरल व्ही. के. वेणुगोपाल यांनी न्यायालयाला सांगितले. पण न्यायालयाने त्यांचा युक्तिवाद फेटाळून लावला. सर्वोच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या समितीत भारतीय किसान युनियनचे भूपिंदरसिंह मान, शेतकरी संघटनेचे अनिल घनवट, कृषी अर्थशास्त्रज्ञ अशोक गुलाटी, आंतरराष्ट्रीय अन्न धोरण संशोधक संस्थेचे प्रमोद जोशी यांचा समावेश आहे. नवे कृषी कायदे हे शेतकऱ्यांच्या हिताचे असून ते त्यांना अधिक पर्याय व स्वातंत्र्य देतील अशा मताचे हे सदस्य आहेत. कृषी कायद्यांमुळे राज्यात शीतगृहे व गोदामे उभारणीसाठी गुंतवणूक वाढेल, असे त्यांचे मत आहे. हे कायदे मागे घेतले गेले, तर शेतकऱ्यांना खुल्या बाजारात येण्याचे मार्ग बंद होतील, अशीही मते या तज्ज्ञांनी यापूर्वी व्यक्त केली आहेत. म्हणूनच चारही तज्ज्ञांच्या नेमणुकीवर सरकारचे हितचिंतक अशी टीका होत आहे. समिती नेमणे व त्यावर सदस्यांच्या नेमणुका या सर्वोच्च न्यायालयाने केल्या आहेत. त्यात मोदी सरकारचा संबंध नाही. म्हणून त्यांच्या नेमणुकांविषयी सरकारला दोष देता येणार नाही. शेतकरी आंदोलनात खलिस्तावादी घुसले आहेत, असे वक्तव्य महाभिवक्त्यांनीच केले होते, त्यासंबंधी न्यायालयाने सरकारला प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

# नव्या इफ्फीत जुन्या आठवणींचा पडदा

**इफ्फी हा गोव्यात होणारा आंतरराष्ट्रीय सिनेमा महोत्सव. यातला एक सिनेमा पाहिला तरी हजार पानांचं पुस्तक वाचल्याचा अनुभव येईल इतका दर्जेदार असतो. दरवर्षी नोव्हेंबर महिन्यात सुरू होणाऱ्या या महोत्सवाची सुरवात यंदा कोरोनामुळे १६ जानेवारीपासून झालीय. प्रत्यक्ष आणि ऑनलाईन असं त्याचं हायब्रीड स्वरूप असणार आहे. यानिमित्ताने गेल्या काही वर्षातल्या महोत्सवातल्या आठवणी ताज्या करायला हव्यात.**

एक

तो बोलत होता. थेटर हाऊसफुल होतं. प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद मिळत होता. टाळ्या कडाडत. हसू फुटत होतं. झामकन वातावरण गंभीरही व्हायचं. अभिनेता विचारी, विचारवंत असेल तर आशयाला किती उंचीवर नेऊ शकतो ते लक्षात येत होतं. विषय होता अभिनय कसा करावा? आणि बोलत होता बोमन इराणी. तो बोलत असताना एक महिला निघून जात होती. थेटरमधे काही लोक उभे राहून त्याला ऐकत होते आणि गर्दीतून वाट काढत जाणाऱ्या महिलेकडे दुडूदुडू जात बोमन तिच्याशी बोलला. का निघून जाताय?' त्यानं विचारलं. महिला म्हणाली, मुलाला शाळेतून घरी आणायचं आहे. त्यामुळे जावं लागतंय.' या प्रसंगालाही अभिनय या विषयाच्या विस्ताराचा भाग म्हणून बोमनने केलेली एकजीव सांधाजोड लाजवाबच! अभिनेत्याला तंत्रज्ञानाचे बारकावे कसे माहीत असावे लागतात, याचं त्यानं केलेलं विवेचन आठवणीत राहिलं.

दोन

ते आले आणि ऐकायला आलेल्यांची संख्या पाहून थक्क झाले. आता मला ऐकायला आठ – दहा लोक येतील. ते ज्येष्ठ नागरिक असतील, असं मला वाटलेलं. पण तुम्ही एवढी गर्दी केलीत, तरुण मुलंही आली. मलाही आश्चर्य वाटलं,' हे त्यांनी नमूद करत आभारही मानले. मग ते बोलत राहिले. सिनेमाच्या विषयाची वैश्विकता महत्त्वाची. ती असेल तर असा सिनेमा कितीही काळ जिवंत राहू शकतो. सिनेमा एकतर चांगला असतो किंवा वाईट. बाकी वर्गीकरण मी करत नाही,' श्याम बेनेगल बोलत होते.

तीन

कला ही काही क्रांती करत नसते. पण क्रांतीचं कारण मात्र होऊ शकते. तंत्रज्ञानापेक्षा आशयच महत्त्वाचा. तंत्रज्ञान नंतर. कंटेंट इज द किंग. डॉ. गिरीश कासारवल्ली स्पष्ट आणि स्वच्छ. मला गोष्ट सांगायला आवडते. मी माझ्या पद्धतीने गोष्ट सांगतो. बाकी अन्वयार्थ प्रेक्षक काढतील. ते वाहत राहिलेलं संपूर्ण महोत्सवात. महोत्सव तेव्हा दहा दिवसांचा असायचा. खूप सजवलेला केक आहे. पाहताच जिभेला पाणी सुटलं. तुम्ही खाल तेव्हा तो बेचव असल्याचं तुमच्या लक्षात आलं तर? सिनेमा अभ्यासकांच्या गटामधे झालेल्या जाहीर चर्चेत लक्षात राहिलेलं वाक्य.





चार

अमेरिकेत कास्टिंग दिग्दर्शक निर्मितीसाठी काम करतात. भारतात कास्टिंग दिग्दर्शकाची भूमिका पूर्णपणे वेगळी आहे. कास्टिंग ही सर्जनशील प्रक्रिया आहे. कास्टिंग सोसायटी ऑफ अमेरिकेच्या सदस्य नॅन्सी बिशप बोलत होत्या. वेगळाच पैलू पडद्यामागचा उलगडत गेलेला.

पाच

नसिरुद्दीन शहा बोलून गेला, मी जगाच्या कानाकोपऱ्यात जाऊन नाटक, सिनेमे पाहिले. निळू फुलेंसारखा ताकदीचा अभिनय पाहायला मिळाला नाही. अशा कैक आठवणींची गर्दी इफ्फीचा विचार करताना धडका मारत होती.

सहा

जगभर चंगळवादी लालसा वाढलीय. पैशासाठी वाट्टेल ते करायची प्रवृत्ती वाढतेय. सगळंच काही हवंहवंसं जगाला वाटू लागलंय. ही हाव चांगली नाही. ती आपल्याला जग नष्ट करण्याकडे घेऊन जातेय. आम्ही कृतज्ञ होणं थांबवलंय. जगाच्या सुंदर रचनेलाच आम्ही विसरलो आहोत. बोलत होते निकिता मिखालकोव.

सिनेमाची उत्तरं मिळवण्याचं ठिकाण

जागतिक कॅलिडोस्कोपच्या प्रवासाच्या किती अनंत या आठवणी. भारताच्या आंतरराष्ट्रीय सिनेमा

**विशेष**

**सुरेश गुदले**

महोत्सवातल्या – इफ्फी म्हणजेच इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल ऑफ इंडियामधल्या. २००४ पासूनच्या. एकेक सिनेमा म्हणजे हजारो पानांचं पुस्तक वाचल्याचा अनुभव. देखणा तापदायी सोहळा. बदल, परिवर्तन, क्रांती, माणसाला किमान तारतम्याने विचार करायला लावणाऱ्या एकसे एक कलाकृती. जग बदलो न बदलो, अमुक अमुक अयोग्य आहे आणि ते ठोका घालून दुरुस्त केलं पाहिजे इतकी कलात्मक जाणीव व्यक्ती स्तरावर देणारे जगाच्या कानाकोपऱ्यातले सिनेमे.

सिनेमा म्हणजे काय? तो कसा पहावा? त्याची निर्मिती कशी करतात? कमी पैशात कशी निर्मिती करावी? ती करताना कोणती काळजी घ्यावी? सिनेमाचं लायटिंग म्हणजे काय? ध्वनीमुद्रण म्हणजे काय? कलाकारांची निवड कशी करतात? गाणी, संगीत म्हणजे काय? व्यक्तिरेखेचा विकास कसा केला जातो? कथा, पटकथा, संवादात पहिल्यांदा कागदावर आणि नंतर संपादनाच्या मेजावर सिनेमा आकाराला जातो असं का म्हणतात? यासारख्या अनंत प्रश्नांच्या मांदियाळीची काही उत्तरं हमखास मिळणारं ठिकाण म्हणजे चुकवू नये असे इफ्फीसारखे महोत्सव. एकवर्षी तर रंग आणि सिनेमाचा आशय अशा दृष्टिकोनातून एका चित्रकर्मीने केलेली सुंदर मांडणी ऐकता–पाहता आलेली.

सिनेमाची परिभाषा बदलली

जगभर हिंसाचाराचा आगडोंब उसळलेला आपण पाहतोय. भरचौकात फासावर लटकवलं पाहिजे यासारखा आवाज टिपेला पोचलाय. माणूस माणसाला ठार करून रक्ताच्या थारोळ्यातल्या मृतदेहावर नाचतो. त्यासाठी काहीही चालतं. जात, देव, धर्म, भाषा, प्रदेश, लिंग, वर्ण, वर्ग काहीही. द्वेषमूलकता किती भयानक वास्तव निर्माण करते, याचा थक्क करणारा पट मांडणारे जगभरातले सिनेमे पाहताना माणूसपण वाढायला मदत होते. एका वर्षी तर धर्म विषयाला वाहिलेली मालिकाच या महोत्सवात होती. युद्धपटांच्या मालिकांची निवड तर अफलातूनच असायची. अलीकडच्या काही वर्षात निवडीविषयीदेखील प्रश्न पडताहेत. द्वेषमूलकता वाढवणारे ऑडियो विज्युअल विडियो आपल्या हातातल्या मोबाईल नामक यंत्रावर आदळतात. आपण त्या पाहायच्या की जगभरातले सिनेमे पाहायचे ही निवड आपल्याला करायचीय. आता सिनेमाची परिभाषा बदललीय. थेटरात जाऊन पाहणं या भाषेपुरतं आपण परिचित होतो. तंत्रज्ञानाने या भाषेत बदल केले. आठवा, पहिल्यांदा टीवी पाहिल्याचा अनुभव. पहिल्यांदा मोबाईलवर पाहिलेला, लक्षात राहिलेला सिनेमा. आता तर कोरोना साथरोगाच्या काळात महोत्सवाच्या नियोजनातही काही बदल झाले. तुम्हाला लिंक मिळणार आणि तुम्ही ती घरबसल्या पाहणार.

संवादाची गळा भेट होईल?

२० नोव्हेंबरपासून दरवर्षी होणारा हा महोत्सव यावेळी कालपासून म्हणजेच १६ जानेवारीपासून सुरू झालाय. यंदा त्याचं स्वरूप प्रत्यक्ष आणि ऑनलाईन असं हायब्रीड आहे. हा महोत्सव गावागावांत गटागटांनी पाहिला गेला तर सिनेमाची साक्षरता वाढेल. अशा किती तरी अर्थांनी तंत्रज्ञानाने सिनेक्षेत्र मुक्त झालंय. सामूहिक आनंदाची मजा घरबसल्या नाही हे खरंच. आभासी संपर्क आणि गळाभेटीतला स्पर्शाचा संवाद पुन्हा काही मुलभूत फरकाची बाकी सलत राहते. असं असलं तरी माणूस सर्व संकटांवर मात करत आल्याचा इतिहास आहे. कोरोनाही जाईल आणि हायब्रीड न राहता प्रत्यक्षातल्या महोत्सवाची स्पर्शाची, संवादाची गळाभेट नक्कीच होईल. यंदा अंतर राखून मात्र मानवीयतेचं अंतर पडू न देता मानवीयतेच्या जागतिक सफरीचा आनंद घेऊन जगूया.

(लेखक गोव्यातील ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

# सरकारी अधिकारीच का व्हावं?

**आज आम्ही गावोगावी व्याख्यानं देत फिरतो. दिसेल त्या विषयावर लिहितो पण एका क्षणी लक्षात येतं की इतकं करून हातात काही उरत नाही. आपण ही हवाई फवारणी करण्यापेक्षा एकाच ठिकाणी ठिबक सिंचन करायला हवं होतं असं वाटून जातं. अधिकारी होण्यात हे ठिबक सिंचन करण्याची खूप मोठी संधी आहे. स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसमोर दिलेलं हेरंब कुलकर्णी यांचं हे फेसबुकवर टाकलेलं भाषण.**

अधिकारी वर्गाला सामाजिक विषयांवर संवेदनशील कसं बनवायचं ही मोठी समस्या वाटते. बालकामगार हा विषय घेऊन पोलिस अधिकाऱ्यांकडे मी जातो तेव्हा ते पारंपरिक पद्धतीने प्रतिवाद करतात. एक अधिकारी म्हणाला की, तुम्ही मुलांना कामावरून काढाल तर ते चोर होतील. त्याचे पालक उपाशी राहतील. हे ते प्रश्नच मुळातून माहीत नसल्याने होतं म्हणून अधिकारी होणाऱ्या माझ्या या तरुण मित्रांना मला हे सांगायचंय की, स्पर्धा परीक्षेची पुस्तकं वाचण्याइतकं महत्त्वाचं ही मनोभूमिका तयार करणं हेही तितकंच महत्वाचं आहे.



सुखासीन जगण्याच्या कल्पना तपासाव्या

मान्य आहे की हे जगणं तुमच्या माझ्या वाट्याला आलं नाही पण अशा प्रकारच्या जगण्याचं वर्णन असलेल्या पुस्तकांच्या वाचनाने आपण या जगाशी जोडले जाऊ शकतो. सुदैवाने मराठीत अशाप्रकारचं खूप साहित्य उपलब्ध आहे. अनिल अवचट यांनी मराठी मध्यमवर्गाच्या सुखासीन जगण्याला या भयावह वास्तवाची दाहकता लक्षात आणून दिली हे त्यांचं खूप मोठं योगदान आहे. त्याचप्रमाणे सर्व दलित आदिवासी आणि भटके विमुक्त लेखकांची आत्मकथनं ही मुळातून वाचली तरीसुद्धा त्या विश्वाशी आपला परिचय होतो. शाळाबाह्य मुलांचं भावविश्व, महिलांची वेदना रेखाटणारी पुस्तकं वाचायला हवी. पी साईनाथ यांच्यादुष्काळ आवडे सर्वांना'या पुस्तकाने माझ्यासारख्या लाखो लोकांच्या जाणिवा तीव्र केल्या. जगण्यात एक कायमचा अपराधीपणा निर्माण केला. आपल्या सुखासीन जगण्याच्या कल्पना या माणसांच्या शोषित जगण्याच्या पार्श्वभूमीवर आपण तपासून घ्यायला लागलो, या पुस्तकात इतकी दाहक वर्णनं आहेत की, या माणसांविषयी आपण काहीच करू शकत नाही एवढ्या एकाच जाणिवेनं आपण खचून जातो. नारळाच्या झाडावर हजारो फुटांची चढउतार करणारे नारळ काढणारे लोक, सायकलवर दगडी कोळसा विकणारे बिहारमधले मजूर, लाकडी मोळ्या विकण्यासाठी कित्येक किलोमीटर पायपीट करणाऱ्या मध्यप्रदेशाच्या बायका हे सारं आपण आपल्या सुखासीन जीवनाशी ताडून बघताना लाज वाटू लागते. अशा जाणिवा विकसित झालेला अधिकारी आपल्या कार्यक्षेत्रात या संवेदनेतून काम करू शकतो.

वंचितांच्या बांधिलकीशी जोडलेलं मूल्य

स्पर्धा परीक्षेत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आता केवळ पोपटपंची करून चालत नाही तर लेखी पेपर आणि मुलाखतीत आकलन तपासलं जातं. तुम्ही ज्या परिसरात राहता त्यावर प्रश्न विचारले जातात. अशावेळी आपल्या परिसरात जाऊन गरिबी प्रत्यक्ष वाचायला हवी. गरिबी पुस्तकात वाचण्यापेक्षा आपण ती गरिबाच्या नजरेत वाचली पाहिजे. आपल्या परिसरात येणारे ऊसतोडणी कामगार वीट भट्टी मजूर कसे जगतात हे प्रत्यक्ष जावून बघायला हवं. गरिबांच्या वस्तीला भेट देणं आणि एखाद्या धबधब्याला भेट देणं सारखंच असतं. धबधब्याखाली ओलं होण्यापासून तुमचा बचाव करू शकत नाही तसं या वस्तीला भेट दिल्यावर तुमच्या मध्यमवर्गीय जाणिवांचा तुम्ही बचाव नाही करू शकत. भावविश्वावर खोलवर परिणाम होतात आणि तुमच्या सर्व कृतीतून ते पाझरतात. गांधी जेव्हा असं म्हणतात की, कोणताही निर्णय घेताना तुम्ही आजपर्यंत बघितलेल्या सर्वात दीन माणसाचा चेहरा डोळ्यासमोर आणा आणि माझ्या या निर्णयाचा यांना काही फायदा होणार आहे का, या निकषावर काम करणं यात गांधींना हेच अभिप्रेत आहे. अधिकारी झाल्यावर साधेपणाने राहणं हेसुद्धा पुन्हा या वंचित वर्गाच्या बांधिलकीशीच जोडलेलं मूल्य आहे. गांधींचा एकदा रुमाल हरवल्यावर ते दूसरा रुमाल घ्यायला तयार नव्हते. याचं कारण तो पैसा गरीब जनतेचा आहे. त्याचा कसाही वापर मी नाही करू शकत नाही ही त्यांची भावना होती. साधेपणा हे मूल्य केवळ उपदेशातून येत नाही तर हा 'नाही रे'चा परीघ त्याला असावा लागतो.

**गेस्ट कॉलम**

**हेरंब कुलकर्णी**

आत्मसन्मान जपायला हवा

मला दिल्लीत परदेशी पाहुणे आल्यावर किंवा सर्वच समारंभात जी उधळपट्टी चालते ती बघितल्यावर त्या खर्चापेक्षा त्या अधिकाऱ्यात आपण हे सारे कोणत्या माणसांचे प्रतिनिधी म्हणून करतो आहोत ही जाणीव त्यात नसते हे जास्त अस्वस्थ करतं. मुशर्रफ भारतात आले तेव्हा जेवणासाठी केलेल्या ११० पदार्थांची वर्णनं मला अजूनही आठवतात. हे सारं तुम्ही भुकेकंगाल देशात करता याची कोणतीही अपराधीभावना नसते. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या शपथविधीचा खर्च ९९ लाख असतो. त्यावर रेष सुद्धा उमटत नाही हे मला जास्त अस्वस्थ करतं.

सरकारी अधिकारी आणि राजकीय दडपण यावर ही एका विद्यार्थ्याने प्रश्न विचारला आहे. मला वाटतं आपला आत्मसन्मान जपणं सर्वात महत्त्वाचं आहे. सिकंदराने पुरू राजाला युद्धात हरवल्यावर त्याला बांधून सिकंदरापुढे आणलं. तेव्हा सिकंदर त्याला विचारतो की मी तुला कसं वागवू सांग? तेव्हा तो म्हणतो की एक राजा दुसऱ्या राजाला जसं वागवेल तसंच मला वागव. हा आत्मसन्मान आपण जपायला हवा. तुम्ही एकदा झुकायला सुरवात केली की मग त्या झुकण्याला शेवटचं असं काही राहत नाही.

राजकीय दडपणात काम करावं लागतं हे मान्यच आहे पण दडपण सुरू होण्याच्या मर्यादेपर्यंत तरी काम करायला काय हरकत आहे? गायीच्या गळ्यात ५० फूट दोरी बांधून तिला चरायला सोडलं आहे. ती ५१व्या फुटापर्यंत चरायला गेली की, तिच्या गळ्याला हिसका बसणार पण मग ४९ फूट चालायला काय हरकत आहे? त्या मर्यादेतही करण्यासारखं खूप असतं पण ५० फुटावर हिसका बसेल म्हणून एक फूटही न चालणारेच अधिकारी जास्त आहेत. उलट जास्त आत्मसन्मान ठेवणाऱ्यांवर राजकीय दडपण येत नाही असेच अनुभव जास्त आहेत. नेताजींच्या नावाने चालणाऱ्या या अकादमीत आमच्यासारख्या अनेकांची व्याख्यानं स्पर्धा परीक्षेतल्या मुलांसाठी ठेवली जातात. या सर्वांचा शेवटी हेतू काय? मला माझे शिक्षक दो आखे बारह हाथ' या जुन्या चित्रपटातली एक गोष्ट सांगायचे. एक जेलर सहा कैद्यांना सुधारतो. ते कैदी सुधारतात. हिंसा सोडून शेती करतात. दरम्यान तो जेलर मरून जातो. कैदी बाजारात भाजी विकायला बसतात. गावकरी त्यांना चोर समजून मारायला लागतात. ते खूप मार खातात. शांत राहतात पण एकाक्षणी ते बिथरतात.

ते प्रतिकार करणार तितक्यात त्यांना आकाशात आपल्या त्या जेलरचे त्यांच्याकडे बघत असलेले डोळे दिसतात आणि ते थबकतात. माझे शिक्षक विचारायचे की समजा त्या कैद्यांना ते दोन डोळे दिसले नसते तर सगळा बाजार त्या कैद्यांनी रक्ताने माखला असता. थोडं थांबून माझे शिक्षक म्हणायचे की, असं आपल्या आयुष्यात कोणते तरी दोन डोळे असले पाहिजेत की मोहाच्या क्षणी आपल्यावर रोखले जातील. या अकादमीत अशी वेगवेगळी होणारी व्याख्यानं तुम्ही अधिकारी झाल्यावर मोहाच्या क्षणी तुमच्यासाठी 'बाबाजी की दो आँखे' म्हणून काम करो हीच सदिच्छा देऊन थांबतो. (समाप्त)

# अगोदर भविष्याचा विचार, नंतरच राजकारण

## 'संवाद तरूणाईशी'मध्ये रोहित पवार यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी

माजलगाव : विद्यार्थ्यांनो आधी आपले शिक्षण पूर्ण करून आपले भविष्य तयार करा आणि मगच राजकरण करा, राजकारणामध्ये तरूणांचा वापर होत असतो त्यामुळे आपले भवितव्याचा विचार करून आपण आपले भविष्य उज्वल करावे, असे मत सुंदराराव सोळंके महाविद्यालयात आयोजित 'संवाद तरुणाईशी' या कार्यक्रमात आमदार रोहित पवार यांनी व्यक्त केले.

माजलगावस्थित सुंदरराव सोळंके महाविद्यालयात आयोजित 'संवाद तरुणाईशी' या कार्यक्रमात आमदार रोहित पवार बोलत होते. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून आमदार प्रकाश सोळंके होते तर बीड जिल्हा परिषदेचे सभापती जयसिंग सोळंके, ॲड.भानुदासराव डक, प्राचार्य डॉ.व्ही.पी.पवार, प्रा.निळकंठ साबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. राजकारणात येण्यापूर्वी तरुणांनी आपली दिशा कोणती आपण काय केले पाहिजे याचा विचार करणे आवश्यक असून त्यानुसार आपले भविष्य निर्माण केले पाहिजे शिक्षण घेऊन रोजगार निर्मिती केली पाहिजे असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. यावेळी त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांचे प्रश्न ऐकून घेत त्यांना दिलखुलास पणे उत्तरे दिली. विद्यार्थ्यांनी देखील अत्यंत चातुर्याने आपले प्रश्न विचारून सामाजिक,शैक्षणिक बाबीवर त्यांचे लक्ष केंद्रित केले. यावेळी बोलताना ते म्हणाले की अनुभवी व्यवसायिकांशी चर्चा करा त्यांनी ज्या पद्धतीने व्यवसाय चालवत आहेत त्यानुसार तुम्ही काम करा प्रत्येक क्षेत्रात करिअर होऊ शकते त्यासाठी मात्र मेहनत आवश्यक असते. युवकांनी चौफेर लक्ष ठेऊन परिसरात घडणाऱ्या गोष्टीकडे लक्ष दिले पाहिजे असे देखील यावेळी म्हणाले. प्रास्ताविकात आमदार सोळंके यांनी विद्यालयातील शैक्षणिक बाबी अधोरेखीत करत नवनिर्मानाच्या संकल्पना विद्यार्थ्यांसमोर मांडल्या. तर आभार जयसिह सोळंके यांनी मांडले.



माजलगाव येथे आयोजीत कार्यक्रमात तरुणांशी संवाद साधतांना आ.रोहित पवार

### 'समाजसेवेसाठी राजकारणात'

एका विद्यार्थ्याने आमदार रोहित पवार यांना आपण राजकारणात का आलात? हा प्रश्न विचारला असता आपण सामाजासाठी काही तरी केले पाहिजे, आपण सामाजाचे देणेकरी आहोत म्हणून काही तरी करायचे आहे. सर्वसामान्य नागरिकांना न्याय द्यायचा आहे समाजाच्या सेवेचे माध्यम म्हणून मी राजकारणात प्रवेश केला असे उत्तर देत उपस्थितांची त्यांनी मने जिंकली.

## नव वधुवरांना शुभाशिर्वाद



माजलगाव :येथील किराणा असोसिएशनचे अध्यक्ष संजय सोळंके यांचे बंधू चि.कुलदिप यांच्या विवाहसोहळ्या प्रसंगी वधुवरांना शुभाशिर्वादपर भेट देताना भाजपा नेते रमेशराव आडसकर, माजी नगराध्यक्ष डॉ.अशोक तिडके, परमेश्वर सोळंके आदी.

## 'यश'चा शुभारंभ



माजलगाव : उद्योजक सुनिल चाळक यांनी यश ॲटोमोबाईल्सचा शुभारंभ केल्याबद्दल पुढील वाटचालीसाठी पुष्पगुच्छ देवून शुभेच्छा देताना विजय मते, एकनाथ लांबूड, वर्तमान माध्यम समुहाचे मुख्य संपादक भगीरथ तोडकरी आदी.

## 'आदित्य'चा प्रारंभ



माजलगाव : येथे छत्रपती संभाजी महाराज चौकात आदित्य एन्टरप्रायजेस फर्निचर ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्सचे लोकप्रिय आमदार रोहित पवार यांच्या हस्ते फित कापून उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी आमदार प्रकाश सोळंके, सभापती अशोक डक, विजयसिंह पंडीत, जयसिंग सोळंके, माधव निर्मळ, आदित्य उद्योग समूहाचे संचालक प्रविण घाडगे आदी.

# आमदार रोहित पवार यांची होके यांच्या निवासस्थानी भेट

प्रतिनिधी

माजलगाव : राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे नेते आमदार रोहित पवार यांनी माजी नगराध्यक्ष अशोकराव होके पाटील यांच्या निवासस्थानी भेट दिली. यावेळी माजी मंत्री तथा माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार रोहित पवार यांच्या हस्ते केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला.

आमदार रोहित पवार हे माजलगावात पत्रकार संघाने आयोजित केलेल्या सत्कार समारंभाच्या कार्यक्रमाला आले असता त्यांनी माजलगावचे माजी नगराध्यक्ष अशोकराव होके पाटील यांच्या निवासस्थानी भेट दिली. यावेळी युवा नेते तन्मय किशोर होके पाटील यांनी या भेटीचे आयोजन केले होते. पाटील यांच्या निवासस्थानी आमदार प्रकाश सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार रोहित पवार यांच्या हस्ते केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी आमदार रोहित पवार त्यांचे स्वागत होके पाटील परिवाराच्या वतीने माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील, माजी नगराध्यक्ष अशोक होके पाटील, ॲड.किशोर होके पाटील, चेअरमन अभय होके पाटील, भारतराव होके यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी त्यांच्या समवेत बहुजन विकास मोर्चाचेअध्यक्ष बाबुराव पोटभरे, माजी आमदार मोहनराव सोळंके, मुंबई बाजार समितीचे सभापती अशोकराव डक, बीड जिल्हा परिषदेचे सभापती जयसिंग सोळंके, माजलगाव नगरीचे नगराध्यक्ष शेख मंजूर, राष्ट्रवादीचे नेते पंकज बोराडे, जिल्हा परिषदेचे समाजकल्याण सभापती कल्याणराव



आबुज, सुभाष सोळंके, जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत शेजुळ, मा.उपनगराध्यक्ष तुकाराम येवले, माजी नगराध्यक्ष प्रतिनिधी नासेरखाँ पठाण, पंचायत समिती सदस्य श्रीहरी मोरे, बाबुसेठ नहार, बबनराव सरवदे, यांचे ही यावेळी तन्मय होके पाटील मित्र परिवाराने स्वागत केले या कार्यक्रमास बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# ध्येय निश्चित करून आवडीप्रमाणे क्षेत्र निवडावे : अंकुशराव निर्मळ

## सकल धनगर समाजाच्या वतीने गुणवंतांचा सत्कार

प्रतिनिधी

माजलगाव : स्पर्धेच्या या युगामध्ये विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्यासाठी आपले ध्येय निश्चित करून आवडीप्रमाणे क्षेत्र निवडावे असे आवाहन धनगर समाज महासंघाचे नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष अंकुशराव निर्मळ यांनी केले. रविवारी सकल धनगर समाज आयोजित खंडोबा मंदिरात गुणवंताच्या सत्कार समारंभात निर्मळ बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिध्द नेत्ररोग तज्ञ डॉ.भारत वाघमोडे हे तर प्रमुख पाहुणे म्हणुन माजी जि.प.सदस्य बबनराव सरवदे, डॉ.भगवानराव सरवदे, ॲड.आरतीताई कांडूरे, किसनराव वगरे, सेवानिवृत्त बीडीओ सुभाषराव गडदे, अण्णासाहेब वगरे, भागवतराव धायगुडे, ज्ञानेश्वर सरवदे, शंकर आबुज, तुकाराम चोरमले, ह.भ.प.शिवाजी महाराज गडदे, आदिनाथ महाराज कुंडकर डॉ.सखाराम गायकवाड, अशोक वाडेकर, कल्याण गवते यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात राष्ट्रमाता अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात




आली. प्रमुख मान्यवरांच्या हस्ते अंकुश निर्मळ, तुकाराम येवले, एनटीएस परिक्षेत उत्तीर्ण, नवोदय, शिष्यवृत्ती परिक्षेत उत्तीर्ण झालेले गुणवंत विद्यार्थी गणेश बागरे, चंदाराणी वगरे, संतोष वगरे, वेदभुषण खोडवे, चिंतामण गोरे, नितीन आबुज, ऋतुजा गडदे, सृष्टी सोनसळे, वैभव कुंडकर, वेदांत गवते, मधुरा सुरनर या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे संयोजन विजय धायगुडे, अमर चोरमले, लक्ष्मण सरवदे यांनी केले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व्याख्याते बाळासाहेब सोनसळे यांनी केले तर सूत्रसंचालन लक्ष्मण सरवदे यांनी केले. आभार प्रा.लक्ष्मीकांत सोन्नर यांनी मानले. या कार्यक्रमास संतोष देवकते, रामभाऊ आबुज, रमेश गाडे, मुक्तीराम आबुज, पंडित भुतकर, कचरू चांभारे, अशोकराव देवकते, आबासाहेब वगरे, विनायक सरवदे, अरूण काळे, कृष्णा गोरे, निलेश गडदे, मुंजा हंडे, यांच्यासह समाज बाधव उपस्थित होते.

## तेलगावात आज कार्यकर्ता संवाद परिषद



प्रतिनिधी

माजलगाव: कर्मवीर एकनाथराव आव्हाड यांच्या जयंती निमित्त कार्यकर्ता संवाद परिषदेचे आयोजन आज दि.१९ जानेवारी मंगळवार रोजी मानवी हक्क अभियान कार्यालय तेलगाव येथे सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे. तरी या कार्यकर्ता परिषदेच्या अध्यक्षस्थानी मानवी हक्क अभियानाचे कार्याध्यक्ष दादासाहेब क्षीरसागर हे राहणार असून कार्यकर्ता संवाद परिषदेचे उद्घाटन डॉ.मिलिंद आव्हाड हे करणार आहेत तर या परिषदेला मार्गदर्शन करण्यासाठी हेरंब कुलकर्णी सामाजिक बदलाचे अभ्यासक हे मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित राहणार आहेत. तरी या कार्यकर्ता संवाद परिषदेस उपस्थित राहण्याचे आवाहन मानवी हक्क अभियानाचे जिल्हाध्यक्ष राजेश घोडे यांनी केले आहे.

# कोरोनामुळे घडले माणुसकीचे दर्शन : आमदार रोहित पवार

## ज्येष्ठ पत्रकार तुकाराम येवले दर्पण पुरस्काराने सन्मानित

प्रतिनिधी

माजलगाव : कोरोना महामारीमुळे जग हादरले. अशा वेळी कुटुंब संस्थेचे महत्व अनेकांनी जाणले. प्रत्येक जण आपआपल्या परीने जमेल ती मदत इतरांना करू लागला. कोरोनामुळे समाजात माणुसकीची भावना वाढीस लागली. आपले कोरोना वॉरियर्स डॉक्टर्स, सरकारी कर्मचारी, सामाजिक संघटना, पोलिस यंत्रणा यांनी केलेल्या कार्याचे महत्व जाणून माजलगाव तालुका पत्रकार संघाने त्यांचा सन्मान केला हे खरोखरच कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन आमदार रोहित पवार यांनी केले. दरम्यान, यंदाच्या दर्पण पुरस्काराने ज्येष्ठ पत्रकार तुकाराम येवले यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

मराठी पत्रकार परिषद, मुंबई संलग्न माजलगाव तालुका पत्रकार संघाच्या वतीने शनिवारी दि.१६ रोजी आयोजित केलेल्या दर्पण, कोरोना योद्धा पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार प्रकाश सोळंके तर प्रमुख पाहुणे म्हणून आमदार रोहित पवार, माजी आमदार मोहनराव सोळंके, राधाकृष्ण होके पाटील, राजेंद्र जगताप, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक, बीड जिल्हा परिषदेचे सभापती जयसिंह सोळंके, भाजप नेते रमेश आडसकर, नगराध्यक्ष शेख मंजूर, आदी उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना आमदार रोहित पवार म्हणाले, आमदार प्रकाश सोळंके यांना आमदारकीचा अनुभव दांडगा आहे. विधानसभेत सेशनमध्ये काही अडचण आली तर आम्ही नवीन आमदार त्यांचे मार्गदर्शन घेतोच परंतु ज्येष्ठ आमदारही अनेकदा प्रकाशदादांचे मार्गदर्शन घेतात. कोरोना काळात अनेकांनी फुल ना फुलाची पाकळी म्हणून इतरांना मदत केली. आज माजलगाव पत्रकार संघाच्या वतीने प्रातिनिधिक स्वरुपात कोरोना वॉरिअर्सचा सन्मान करण्यात आला. परंतू हजारो लोक ज्यांनी आपली पर्वा न करता अनेकांची



ज्येष्ठ पत्रकार तुकाराम येवले यांना सन्मानित करताना मान्यवर.

मदत केली आहे. आज जे इथे उपस्थित नाहीत अशा सर्वच कोरोना वॉरिअर्सचे मी मनापासून आभार व्यक्त करतो. यापूर्वी खासदार सुप्रियाताई सुळे, राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार या कार्यक्रमासाठी आले होते. आज मी या पत्रकार संघाच्या कार्यक्रमास आलो आहे. आता राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांना येत्या काळात या कार्यक्रमासाठी आणण्यासाठी मी प्रयत्नशिल राहिल असे आमदार रोहित पवार म्हणाले. भाजप नेते रमेश आडसकर यांच्या भाषणाचा उल्लेख करून आमदार रोहित पवार म्हणाले की, पवार घराण्याच्या राजकीय वारसाचा फायदा मला नक्कीच झाला. मी मतदारसंघ निवडत असताना मी असा मतदारसंघ निवडला की मी जिथे निवडून येईल का नाही हे न पाहता मला त्या मतदारसंघात काम किती करावे लागेल याचा अभ्यास मी प्रथम केला. आणि नंतर मी जामखेड-कर्जत मतदारसंघातून निवडून आलो. प्रत्येक कार्यक्रमातील भाषणाचा बारकारीने अभ्यास आम्हाला करावा लागतो. कोरोनाच्या काळात मी लोकांची कामे करण्यात व्यस्त होतो. राजकारणात आपण दुय्यमस्थानी आणि लोक प्रथमस्थानी असावेत. माजलगाव तालुक्यात दोन कोटी पेक्षा जास्त मदत कोरोना काळात झाली ही सर्वात मोठी बाब आहे. आज माजलगाव पत्रकार संघाने खऱ्या कोरोना वॉरियर्सचा सन्मान केला आहे. ज्या पध्दतीने आपण सर्व जण एकत्र आला आहात अशाच पध्दतीने तालुक्याच्या, जिल्ह्याच्या विकासासाठी एकत्र या असे आवाहनही आमदार रोहित पवार यांनी केले. यावेळी बोलताना आमदार सोळंके म्हणाले, माजलगाव पत्रकार संघाने तुकाराम येवले यांचा दर्पण पुरस्कार देऊन गौरव केल्याने खऱ्या अर्थाने त्यांच्या पत्रकारितेचे सार्थक झाले आहे. पत्रकारिता करताना पत्रकारांना येणाऱ्या समस्या सोडविण्याचा मी मनापासून प्रयत्न करीन असे आश्वासनही आमदार सोळंके यांनी यावेळी बोलताना दिले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार संघाचे अध्यक्ष हरिष यादव तर, सूत्रसंचालन पांडुरंग उगले यांनी केले. कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात नागरिक उपस्थित होते.

### या कोरोना योद्ध्यांना मिळाले पुरस्कार

डॉ.सुरेश साबळे, डॉ.गजानन रुद्रवार, डॉ.अनिल परदेशी, डॉ.यशवंत राजेभोसले, डॉ.श्रेयस देशपांडे, डॉ.स्नेहल जाधव, डॉ.पूजा देशमुख, टेंबे गणेश मंडळ युवा ग्रुप, राजेश्री, राजेंद्र आनंदगावकर व मंजरथ ग्रामस्थ, सुरेंद्र रेदासनी, रियाज काझी, शेख बाबा, एकनाथ मस्के, शाम देशमुख, अझहर नाईक, नितीन क्षीरसागर.

# तुळजाभवानी अर्बनचे सामाजिक कार्य उल्लेखनीय

## जि.प.सदस्या मंगलाताई सोळंके यांचे प्रतिपादन;तुळजाभवानी अर्बनच्या महाआरोग्य शिबिराला मोठा प्रतिसाद

प्रतिनिधी

माजलगाव : तुळजाभवानी अर्बनने सहकाराबरोबरच सामाजिक क्षेत्रातही अग्रेसर राहून काम सुरू केले आहे. राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब आणि क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीनिमित्त तुळजाभवानी अर्बनने पुढाकार घेवून महिलांसाठी महाआरोग्य शिबिर आयोजन केले हे उल्लेखनीय आहे, असे प्रतिपादन माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या अध्यक्षा तथा बीड जिल्हा परिषदेच्या सदस्या सौ.मंगलाताई प्रकाशराव सोळंके यांनी रविवारी आरोग्य शिबिरात केले. तुळजाभवानी अर्बन आयोजित महाआरोग्य शिबिराच्या अध्यक्षस्थानावरून सौ.सोळंके बोलत होत्या.

तुळजाभवानी अर्बनचा वर्धापनदिन आणि राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब व क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित महिलांसाठी मोफत महाआरोग्य तपासणी शिबिर रविवारी पार पडले.





यात गरजू महिलांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती लावून तपासणीचा लाभ घेतला. या महाआरोग्य शिबिराच्या अध्यक्षस्थानी माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या अध्यक्षा तथा बीड जि.प.सदस्या सौ.मंगलाताई प्रकाशराव सोळंके होत्या तर शिबिराचे उद्घाटन बीड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सौ.शिवकन्याताई शिवाजीराव सिरसाट यांनी केले. यावेळी प्रमुख उपस्थितीमध्ये सौ.पल्लवीताई विरेंद्र सोळंके, तुळजाभवानी अर्बनच्या अध्यक्षा सौ.दिपालीताई चंद्रकांत शेजुळ, पंचायत समिती सभापती सौ.सोनालीताई भागवतराव खुळे, जि.प.सदस्या सौ.अनुसया रामप्रभु साळुंके, सौ.वैशालीताई सावंत, सौ.भारतीताई तिडके, तहसीलदार वैशाली पाटील, गटविकास अधिकारी प्रज्ञा माने, नगरसेविका सुदामतीताई पौळ, सिमाताई होके, स्वातीताई डोंगरे आदींची होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी शहाजी शेजुळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अशोक शेजुळ, सुमित शेंडगे, भास्कर गवळी आदींसह संस्थेच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. या महाआरोग्य शिबिरात बार्शी येथील कॅन्सरतज्ज्ञ डॉ.नंदकुमार पानसे, डॉ.प्रतिभा मुळे, डॉ.विजया दुलांगे, डॉ.अंजली मुंडे, वंधत्व तज्ज्ञ नंदकुमार मोरे, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ.अर्चना मोरे, डॉ.अंजली अकोलकर, डॉ.प्रिती रूद्रवार आदी तज्ज्ञ डॉक्टरांनी गरजू लाभार्थी महिलांची तपासणी करून योग्य मार्गदर्शन आणि उपचार केले. तसेच यावेळी आवश्यक ती मोफत औषधी देण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.करूणाताई कोल्हे यांनी तर आभार तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेटच्या अध्यक्षा सौ.दिपालीताई चंद्रकांत शेजुळ यांनी मानले. या आरोग्य शिबिराला महिलांचा मोठा प्रतिसाद मिळाला असून शेकडो महिलांनी मोफत तपासणी शिबिराचा लाभ घेतला. या उत्तम प्रतिसादाबद्दल संस्थापक चंद्रकांत शेजुळ यांनी समाधान व्यक्त केले.

### महिलांनी आरोग्याबाबत दक्ष असावे : जि.प.अध्यक्षा शिवकन्याताई सिरसाट

आरोग्य शिबीराच्या उद्घाटक बीड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा शिवकन्याताई शिवाजीराव शिरसाट म्हणाल्या, महिला ही कुटुंबाचा कणा असते त्यामुळे महिलांनी आरोग्याबाबत दक्ष रहावे. वेळोवेळी आरोग्य तपासणी करून निरोगी रहावे. तर महापुरूषांची जयंती कशी साजरी करावी याचा परिपाठ तुळजाभवानी अर्बनने घालून दिला. त्याचा आदर्श इतर संस्थांनी घ्यावा असे आवाहनही सौ.सिरसाट यांनी केले.

## 'दीपपर्व'चे ग्रॅण्ड अवलोकन



माजलगाव : तुळजाभवानी अर्बनच्या सभागृहात 'दीपपर्व'चे अवलोकन करताना माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या अध्यक्षा जि.प.सदस्या मंगलाताई प्रकाशराव सोळंके, वैशाली सावंत, तुळजाभवानी अर्बनच्या अध्यक्षा दिपाली चंद्रकांत शेजुळ, आबेगावच्या सरपंच वसुधा भागवतराव शेजुळ, जि.प.सदस्या अनुसया रामप्रभू साळुंके, भारती तिडके, वैशाली विजयसिंह सोळंके, तहसीलदार वैशाली पाटील, गटविकास अधिकारी प्रज्ञा माने, पंचायत समिती सभापती सोनाली भागवतराव खुळे, नगरसेविका स्वाती डोंगरे, सुदामती पौळ, सिमा होके आणि 'वर्तमान'चे मुख्य संपादक भगीरथ तोडकरी.

## एकनाथ मस्के कोरोना योध्दाने सन्मानित


प्रतिनिधी

माजलगाव : येथील लोकनेते सुंदरराव सोळंके महाविद्यालयामध्ये लिपीक या पदावर कार्यरत असलेले एकनाथ संपतराव मस्के यांनी कोरोना काळात पगारातून अनेकांना एक लक्ष रूपयांची आर्थिक मदत केली होती. याची दखल घेत पत्रकार संघाने त्यांना कोविड योध्दा पुरस्कार जाहीर केला होता. शनिवारी झालेल्या दर्पण पुरस्कार वितरण कार्यक्रमात आमदार रोहित पवार यांच्या हस्ते मस्के यांचा सहपरिवार गौरव करण्यात आला.

तालुक्यातील पात्रुड गावचे माजी सरपंच एकनाथ मस्के यांनी कोरोना काळात अनेकांना मदत केलेली आहे. कोरोनामुळे लॉकडाउन झाले आणि मजूरांच्या हाताला काम नव्हते म्हणून त्यांनी मजूर कुटूंबीयांना एक लाख रूपयांची आर्थिक मदत केली तसेच गावातील व इतरठिकाणी पाच हजार मास्कचे



वाटप देखिल त्यांनी केले होते. त्यांच्या या कार्याची दखल घेत पत्रकार संघाने त्यांना कोविड योध्दा हा पुरस्कार जाहिर केला होता. दर्पण पुरस्कार वितरण कार्यक्रमात कर्जत–जामखेडचे युवा आमदार रोहित पवार यांच्या हस्ते आमदार प्रकाश सोळंके यांच्या उपस्थितीत त्यांचा सहकुटूंब पुरस्कार देउन सन्मान करण्यात आला.









# अठरापगड जातींना जोडणारा दुवा

**माजलगाव मतदारसंघाचे भाग्यविधाते आमदार प्रकाश सोळंके यांचा १४ जानेवारी हा वाढदिवस; त्यानुषंगाने जिल्हा परिषद समाजकल्याण सभापती कल्याण आबुज यांचा हा विशेष लेख 'वर्तमान'च्या वाचकांसाठी देत आहोत.**

निमित्त

**कल्याण आबुज**

सन २००२ च्या खानापूर ग्रामपंचायत निवडणुकीपासून ग्रामपातळीपासून माझ्या राजकीय कारकीर्दीस प्रारंभ झाला. तेंव्हापासून माजलगाव मतदारसंघाचे भाग्यविधाते प्रकाशदादा सोळंके यांच्या विचाराने भारावून गेलो तो आजतागायत. प्रकाशदादा सोळंके यांनी जातीपातीच्या राजकारणाला कधीच थारा दिला नाही. एक सर्व समावेशक व्यक्तीमत्व म्हणून प्रकाशदादा सोळंके यांच्याकडे पाहिले जाते. एक व्यापक राजकारणी म्हणून माझ्यासारख्या अनेक सामान्य कार्यकर्त्यांसाठी प्रकाशदादा सोळंके सदैव आदर्शवत, प्रेरणादायी व्यक्तीमत्व आहेत. चौफेर विकास करणारे प्रकाश सोळंके अठरापगड जातींना बरोबर घेऊन राजकारण करत आहेत. कदाचित त्यांचा राजकारणाचा हाच केंद्रबिंदू म्हणावा लागेल.

माजलगाव पंचायत समितीचे सभापती ते राज्याचे मंत्री हा प्रकाशदादा सोळंके यांचा राजकीय प्रवास विकासाभिमुख राहिलेला आहे. विकास आणि जनतेचे कल्याण साधणारे प्रकाशदादा माझ्यासारख्या अनेक तरूण कार्यकर्त्यांसाठी मार्गदर्शक ठरलेले आहेत. एक कुशल संघटक आणि विकासाचा दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून प्रकाशदादा सोळंके यांचे राजकारण पुढे जात आहेत. प्रकाशदादा सोळंके यांना माजलगाव मतदारसंघाचे भाग्यविधाते का? म्हणतात याचे कोडे त्यांच्या समवेत काम केल्यासच लक्षात येते हा माझा स्वानुभव आहे. विकासाच्या मुद्यावर कसलीच तडजोड प्रकाशदादांना मान्य नसते हे मी अनेकदा अनुभवले आहे. युवकांना मानाचे स्थान मिळावे, यासाठी प्रकाशदादा सोळंके नेहमी आग्रही असतात. अगदी ग्रामपंचायत पातळीपासून स्थानिक स्वराज्य संस्था, कृषी उत्पन्न बाजार समित्या, नगरपालिका, खरेदी–विक्री संघ, नगर पंचायतीसह विविध संस्थांवर युवकांना संधी देण्यात आली.

**विकासाभिमुख नेतृत्व :**प्रकाशदादा सोळंके हे बीड जिल्ह्याच्या राजकीय पटलावर विकासाभिमुख नेतृत्व आहे. माजलगाव मतदारसंघ तीन तालुक्यांचा आहे. केवळ माजलगावच नव्हे तर धारूर, वडवणी तालुक्यांच्या विकासासाठी प्रकाशदादा आग्रही असतात. गावोगावी समाज मंदिरे, सभामंडप, अंगणवाडी, शाळेच्या इमारती, गावाअंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा योजना राबवून ग्रामीण भागात विकासाची गंगा पोहोचली पाहिजे हा दृष्टीकोन प्रकाशदादा यांच्या ठायी आहे. ग्रामीण भागातील कार्यकर्ता मोठा झाला पाहिजे, यावर प्रकाशदादा यांचा भर असतो.

**प्रकल्प महर्षी :**पंचायत समिती सभापती ते राज्याचे मंत्री असा प्रकाशदादा सोळंके यांच्या राजकारणाचा चढता क्रम लागतो. सत्तेत कोणतेही पद मिळाले तरी त्यांचा जनतेच्या विकासासाठी सदुपयोग करणे याला प्रकाशदादा सोळंके प्राधान्य देतात. विकासमहर्षी तथा महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री सुंदररावजी सोळंके यांच्या समाजकारण, राजकारणाचा वसा आणि वारसा प्रकाशदादा सोळंके समर्थपणे पेलवत आहेत. सुंदररावजी सोळंके यांच्या प्रमाणेच विकासाचे प्रकल्प राबविण्यावर प्रकाशदादा सोळंके यांचा भर आहे. अनेक ठिकाणी गोदावरी नदीवर बंधारे बांधली. त्यात ढालेगाव, सादोळा, तारूगव्हाण, राजेटाकळी आदी ठिकाणी बंधारे बांधून हजारो हेक्टर जमीन सिंचनाखाली आणून शेकडो शेतकऱ्यांच्या जीवनात हरित क्रांती आणली आहे. सोन्नाखोटा प्रकल्प, लोणी–सावंगी उपसा जलसिंचन योजना मार्गी लावण्यासाठी प्रकाशदादा सोळंके यांना विकासाच्या बाबतीत प्रकल्प महर्षी म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.

**हजारो बेरोजगारांच्या हाताला काम :**प्रकाशदादा सोळंके यांचे राजकारण विकासाला धरून आहे. हजारो युवकांच्या हाताला हक्काचे काम देवून त्यांच्या संसारात आनंद निर्माण करण्याचे काम प्रकाश सोळंके करत आले आहेत. तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्यामुळे परिसरातील शेतकरी सुखी



झाला आहे. गेल्या ३० वर्षापासून हा साखर कारखाना प्रगती पथावर आहे. शेतमजूर, शेतकरी विकासाच्या प्रवाहात आणला आहे. साखर कारखान्यामुळे अनेकांच्या जीवनात विकासाची गंगा आणली आहे.

**११५ कोटींचा निधी आणला :** प्रकाशदादा सोळंके राज्याचे पुनर्वसन मंत्री असताना माजलगाव धरणाच्या कार्यक्षेत्रात पुनर्वसन झालेल्या २२ गावांच्या सर्वांगीण विकासासाठी तब्बल ११५ कोटींचा निधी खेचून आणला. या निधीमधून २२ गावांचा विकास केला.

**प्रशस्त इमारती उभारल्या :** प्रकाशदादा सोळंके यांनी प्रशासकीय कामांना गती मिळावी म्हणून खूप प्रयत्न केले. जीर्ण इमारती झाल्याने नव्या प्रशस्त इमारती उभारल्या. त्यात तहसिल कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, न्यायालय इमारत, प्रशासकीय अधिकाऱ्यांची निवासस्थाने, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, आयटीआय कॉलेज, मुलींचे वसतिगृह आदी इमारती नव्या जागेत प्रशस्त उभारला. त्याचप्रमाणे उपजिल्हा रूग्णालयासाठी आमदार प्रकाश सोळंके यांचा पाठपुरावा सुरू आहे. शैक्षणिक पातळीवर मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची द्वारे खुली केली. सिंदफणा पब्लिक स्कूलच्या माध्यमातून दर्जेदार इंग्रजी माध्यमाचे शिक्षण दिले जात आहे. अशा या बहुआयामी व्यक्तीमत्वाला राजकारणात याहीपेक्षा मोठे यश मिळो, दीर्घायुष्य लाभो याच वाढदिवसाच्या शुभेच्छा देतो.

(लेखक : बीड जिल्हा परिषदेत समाजकल्याण सभापती आहेत.)

आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय,23, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022, **सल्लागार संपादक : चंद्रकांत शेजुळ**